नोंदणी क्रमांक : (ई) – २०१४० मुंबई
वेबसाईट : www.bhidekul.in

# नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान, मुंबई

मुंबई कार्यालय : सौ. संपदा भिडे
A/५०३, श्री. साई–शारदा हौसिंग सोसायटी,
भवानी शंकर रोड, दादर (पश्चिम)
मुंबई – ४०० ०२८
मो.: ९८१९९५१३९१/९८९२५०४०४२

पुणे कार्यालय : ले. क. (नि.) श्री. सुनील भिडे
ए–२०१, नील सदन, १४२६, सदाशिव पेठ
पुणे विद्यार्थी गृहासमोर
पुणे – ४११ ०३०
मो.: ९६२३०१७४४४/९६५७५४१२३६

दिनांक १० सप्टेंबर २०२५

## अध्यक्षांचे मनोगत



सर्व भिडे कुलबंधू, भगिनी व माहेरवाशिणी आणि हितचिंतकांना नमस्कार !

नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानची २४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा घेत आहोत. भिडे प्रतिष्ठानचे अध्यक्ष स्व. शशिकुमार के. भिडे यांचे नुकतेच निधन झाले. त्यांचे स्मृतीस अभिवादन करून त्यांना भावपूर्ण आदरांजली ! प्रतिष्ठानच्या कार्याची ज्योत अखंडपणे तेवत ठेवण्यासाठी स्व. शशिकुमार भिडे यांनी शेवटच्या श्वासापर्यंत आपले बहुमोल योगदान दिले. त्यांनी दिलेल्या मार्गदर्शनाची शिदोरी घेऊन आपण प्रतिष्ठानच्या कार्याचा आलेख सदैव चढता ठेवणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल. त्यांच्या अध्यक्षपदाच्या काळात त्यांच्या इच्छेनुसार पुण्यात एक दिवसीय संमेलन घेतले होते.

दि. १७ व १८ जानेवारी २०२६ ह्या दोन दिवशी भिडे प्रतिष्ठानचे २१ वे भिडे कुलसंमेलन गौरीनंदन हॉल, गणपतीपुळे येथे घेत आहोत. तरी सर्वांनी जास्तीतजास्त संख्येने उपस्थित राहावे ही आग्रहाची विनंती ! संमेलनासंबंधी माहिती ऑक्टोबर आम्ही भिडे अंक, वेबसाईट तसेच विशेष निमंत्रण पाठवून सूचित केली जाईल.

एक आनंदाची बाब म्हणजे प्रतिष्ठानची वास्तू व्हावी ह्यासाठी २०२४ आणि २०२५ भिडे संमेलनामध्ये श्री. श्रीधरपंत भिडे आणि श्री. मिलिंद भिडे (छत्तीसगड) ह्या भिडे मंडळींनी वास्तूसाठी ६३ लाख रुपये देणगी दिली. परंतु जागेची खरेदी व नूतनीकरण मिळून खर्चाचे बजेट सुमारे ८० लाखापर्यंत गेले आहे. आम्ही सर्व कार्यकारिणीने धाडसाने घेतलेल्या ह्या निर्णयाला आपल्यासारखी भिडे मंडळी, हितचिंतक, आश्रयदाते वास्तूकरिता नक्कीच आर्थिक मदत करतील असा विश्वास वाटतो.

अनेक भिडे मंडळी शैक्षणिक, वैद्यकीय देणगी देतात. त्यातच शिक्षणासाठी परदेशी जाणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थिनींसाठी सुद्धा आपण आर्थिक मदत विनापरतफेड देत आहोत. त्या निधीमध्ये सुद्धा वृद्धी होण्यासाठी आर्थिक पाठबळ अपेक्षित आहे. प्रतिष्ठानचे विश्वस्त, सदस्य, पदाधिकारी, हितचिंतक व आश्रयदाते ह्यांच्या आशीर्वादाने प्रतिष्ठानला पाठबळ मिळते आहे, त्यामुळेच संस्थेची प्रगती होत आहे. गेली सुमारे २५ वर्षे संस्थेची निस्वार्थपणे, अखंडपणे प्रतिष्ठानची सेवा करीत आहेत परंतु त्यातील काही मंडळींना वयपरत्वे, मनामध्ये उर्मी असूनसुद्धा शारीरिक मर्यादा येत आहेत. त्यामुळे भिडे कुटुंबातील नवीन व्यक्तींनी स्वत: पुढे येऊन प्रतिष्ठानच्या कार्यात सहभागी व्हावे.

ह्या कार्यकारिणीचा ५ वर्षांचा कार्यकाल २०२६ मध्ये संपतो आहे, त्यामुळे भिडे व्यक्तींना सक्रीय होण्याचे मी आवाहन करतो आहे. सोबत वार्षिक हिशोब पत्रके, ताळेबंद जोडलेला आहेच. आपले सर्वांचे सहकार्य आजपावेतो आहेच, भविष्यातही ते मिळत राहील याची खात्री आहे.

**चंद्रकांत शंकर भिडे**
**अध्यक्ष – नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान**

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानच्या सभासदांची चोवीसावी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. २८ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता विशाल सह्याद्री ट्रस्ट, २०४४/४५, सदाशिव पेठ, सह्याद्री सदन, टिळक रोड, काका हलवाईचे मागे, पुणे - ४११ ०३०. येथे बोलविण्यात आलेली आहे. सर्व सभासद भिडे कुलबंधू-भगिनी व माहेरवाशिणींनी वेळेवर उपस्थित राहावे ही विनंती !

## सभेपुढील विषय

१) स्वागत व प्रास्ताविक
२) मागील २२ सप्टेंबर २०२४ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचन व मान्यता.
३) आर्थिक वर्ष २०२४-२५ च्या वार्षिक अहवालाला मान्यता.
४) ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाच्या हिशोब पत्रकांना मान्यता
५) सन २०२५-२०२६ या सालासाठी वैधानिक हिशोब तपासनीस यांची नेमणूक करणे व त्यांचे मानधन ठरविणे.
६) सन २०२५-२६ या सालासाठी अंदाजपत्रक सादर करणे व मान्यता.
७) सभासदांकडून आलेल्या सूचनांचा व पत्रांचा विचार करणे.
८) मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळचे विषय.

**विशेष सूचना** – (१) ज्या सभासदांना काही सूचना, प्रस्ताव इत्यादी द्यावयाचे असतील अथवा माहिती पाहिजे असल्यास अथवा प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनी लेखी अर्ज सहसचिव ले. क. (नि.) सुनील भिडे, १४२६, सदाशिव पेठ, नील सदन, ए-२०१, पुणे विद्यार्थी गृहासमोर, पुणे - ४११ ०३०. या पत्त्यावर दि. २१ सप्टेंबर २०२५ पर्यंत आणून द्यावेत अथवा पोस्टाने पाठवावेत. ऐनवेळी विचारलेले प्रश्न व सूचना यांची दखल अध्यक्षांच्या परवानगीशिवाय घेतली जाणार नाही.

(२) गणसंख्येअभावी सभा तहकूब करावी लागल्यास तहकूब झालेली सभा त्याच दिवशी, त्याच ठिकाणी वरील कामकाजासाठी अर्ध्या तासाने सुरु होईल आणि अशा सभेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही.

**कार्यकारिणीच्या आदेशान्वये**
**दिलीप वासुदेव भिडे**
**सचिव, नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान**

Name of the NITYUNDAN GOTRIYA BHIDE PRATISHTHAN Trust

Registration no.: **E-20140 (MUMBAI)**

BALANCE SHEET AS AT 31.03.2025

| FUNDS AND LIABILITIES | Rs. | Rs. | PROPERTY AND ASSETS | | Rs. |
|---|---|---|---|---|---|
| TRUSTS FUNDS OR CORPUS | | | IMMOVEABLE PROPERTIES | | |
| Balance as per last | 1,011 | | (at cost)(suitably classified | | |
| Balance Sheet | | | giving mode of valuation ) | | |
| adjustments / | | | Addition or deduction (Including | | |
| Additions during the | 0 | | those for depreciation) if any | | |
| year | | | during the year | | |
| | | 1,011 | INVESTMENTS :- | | 1,41,72,798 |
| | | | (Fixed deposits) (Annexure II) | | |
| | | | Note- The market value of the | | |
| | | | above investment RS. | | |
| OTHER EARMARKED FUNDS | | 1,30,09,542 | Interest accrued on Fixed Deposits | | - |
| (Created under the | | | FURNITURE & FIXTURE | | |
| Provisions of the Trust | | | Balance as per last | 14,204 | |
| Deed or Scheme or | | | Balance Sheet | | |
| out of the Income ) | | - | Additions during the ye: | - | |
| Corpus Building Fund | 63,00,000 | | Less - Sales during the year | | |
| Corpus fund | 21,69,789 | | Depreciation upto date | 4,205 | 10,000 |
| Life Membership Fund | 3,18,400 | | LOANS(Secured or Unsecured) | | |
| Members Fund | 6,36,964 | | (Good / doubtful) | | |
| Members Welfare Func | 3,25,289 | | Loan Scholarships | | |
| Pradeep & Sheela Bhide | | | Other Loans | | - |
| - Education Fund | 15,00,000 | | ADVANCES :- | | |
| Education Aid Fund | 11,50,000 | | To Trustees | | - |
| Medical Aid Fund | 5,14,100 | | To Employees | | |
| Sammelan Fund | 95,000 | | To Contractors | - | - |
| Deposit for Prizes | | | To Advance Tax | | - |
| LOANS (Secured or Unsecured) | | | To Tax deducted at source | | 72,641 |
| From Trustees | - | | | | |
| From Others | - | | Stock of Kulvritta Copies | 33,200 | 31,200 |
| LIABILITIES | | - | Opening Balance | 2,000 | |
| | | | Interest Receivable | | 2,52,711 |
| For Expenses Accounts Writing Chgs | | 20,000 | | | |
| Audit Fees | 20,000 | - | | | 5,78,470 |
| For Advances/Rent | | | C a) In Savings Account | 5,78,470 | |
| Other Deposits | - | - | b) With the trustee | - | |
| For Expenses | | | c) With the Manager | | |
| Balances | | | | | |
| INCOME AND EXPENDITURE ACCOUNT | | | INCOME AND EXPENDITURE ACCOUNT | | |
| Balance as per last | | | Balance as per last | | |
| Balance Sheet | 18,05,725 | | Balance Sheet | | |
| Less :- Appropriation, if any | | | Less :- Appropriation , if ai | - | |
| Add :- Surplus} as per | 2,81,540 | | Add :- Deficit } as per | - | |
| Less:- Deficit } Income | - | | Less:- Surplus} Income | | |
| & Expenditure a/c | | | & Expenditure a/c | | - |
| | | 20,87,265 | | | |
| TOTAL :- | | 1,51,17,818 | TOTAL :- | | 1,51,17,818 |

As per our report of even date

For Shripad Waikar & Associates
Chartered Accountants
(FRN-133610W)

The above Balance Sheet to the best of my belief contains a true account of the Funds and Liabilities and of the Property and/Assets of the Trust.
For NITYUNDAN GOTRIYA BHIDE PRATISHTHAN

CA Shripad Waikar
Proprietor (M. No. 140416)
Place: Pune
Date : 24/08/2025
UDIN : 25140416BMIOCI5911

Chandrakant S. Bhide — Executive President
Madhav P. Bhide — Treasurer
Dilip V. Bhide — Secretary

THE BOMBAY PUBLIC TRUSTS ACT,1950 **SCHEDULE IX [Vide Rule-17(1)]**

Registration no.: E-20140 (MUMBAI)

Name of the Public Trust NITYUNDAN GOTRIYA BHIDE PRATISHTHAN *Trust*

INCOME AND EXPENDITURE ACCOUNT FOR THE YEAR ENDING 31.03.2025

| EXPENDITURE | RS. | RS. | INCOME | RS. | RS. |
|---|---|---|---|---|---|
| To Expenditure in respect of properties | | | By Rent (Accrued) | | - |
| Rates,Taxes,Cesses | | | (Realised) | | - |
| Repairs and Maintenance | | | By Interest (Accrued) | - | - |
| Salaries | | | (Realised) | - | - |
| Insurance | | | On securities | - | |
| Depreciation (by way of provision or adjustments) | | | On loans | - | |
| Other Expenses | | | On Bank Accounts | | |
| | | | F.D. | 6,65,384 | |
| To Establishment Expenses (Annexure I) | | 4,79,328 | SAVINGS | 35,456 | |
| | | | | | 7,00,840 |
| To Remuneration to Trustees | | | By Dividend | | - |
| To Remuneration (in the case of a math) to the head of the math including his household expenditure , if any | | | By Donation, in Cash or Kind | | |
| | | | a)From other trusts | - | |
| | | | b)From others | 1,16,413 | 1,16,413 |
| | | | By Grants from Govt. | | - |
| To Legal Expenses | | | | | |
| To Audit Fee | | 23,150 | | | |
| To Contribution and Fees | | | | | |
| To Amount Written Off | | | | | |
| a) Bad Debts | | | By Income from other sources (In details as far as possible) | | 2,04,970 |
| b)Loan Scholarships | | | | | |
| c)Irrecoverable rents | | | | | |
| d)Other Items - Stock Written Off | | | Advertisement | 54,300 | |
| To Miscellaneous Expenses | | | Education Aid Receipts | 33,000 | |
| To Depreciation | | 4,205 | Miscellaneous Receipts | - | |
| To Amounts transferred to Reserve or Specific Funds | | | Sammelan Contribution | 1,13,000 | |
| To Loss on Sale of Investment / Assets | | | Interest on IT Refund | 4,670 | |
| To Expenditure on Objects of the Trust | | | | | |
| a) Religious | | | | | |
| b) Educational | | 1,87,500 | By Transfers from Reserve | | - |
| c) Medical Relief | | 10,000 | | | |
| d) Social - Awards & Prizes | | 36,500 | | | |
| e) Other Charitable Objects | | - | | | |
| To Surplus Carried over to Balance Sheet | | 2,81,540 | By Deficit carried over to Balance Sheet. | | - |
| TOTAL Rs.:- | | 10,22,223 | TOTAL RS :- | | 10,22,223 |

For NITYUNDAN GOTRIYA BHIDE PRATISHTHAN

As per Our report of even date

For Shripad Waikar & Associates
Chartered Accountants
(FRN-133610W)

Chandrakant S. Bhide
Executive President

Madhav P. Bhide
Treasurer

Dilip V. Bhide
Secretary

CA Shripad Waikar
Proprietor (M. No. 140416)
Date : 24/08/2025 -
Place: Pune
UDIN : 25140416BMIOCI5911

REPORT OF AN AUDITOR RELATING TO ACCOUNTS AUDITED
UNDER SUB-SECTION (2) OF SECTION 33 & 34 AND RULE 19 OF
THE BOMBAY PUBLIC TRUSTS ACT

Registration No.:- **Registration no.: E-20140 (MUMBAI)**
Name of the Public Trust:- NITYUNDAN GOTRIYA BHIDE PRATISHTHAN

For the year ending 31.03.2025

a) Whether accounts are maintained regularly and in accordance with the provisions of the Act and the rules ;............ ..................................................... ........... Yes

b) Whether receipts and disbursements are properly and correctly shown in the accounts ................. ......................... ..................................................... ........... Yes

c) Whether the cash balance and vouchers in the custody of the manager or trustee on the date of audit were in agreement with the accounts;........................ ........... Yes

d) Whether all books, deeds, accounts, vouchers or other documents or records required by the auditor were produced before him;..... ........... Yes

e) Whether a register of movable and immovable properties is properly maintained, the changes therein are communicated from time to time to the regional office and the defects and inaccuracies .......... mentioned in the previous audit report have been duly complied with; ........... Yes

f) Whether the manager or trustee or any other person required by the auditor to appear before him did so and furnished the necessary........................ information required by him; ........... Yes

g) Whether any property or funds of the Trust were applied for any object or purpose other than the objects or purpose of the Trust;............................... ........... No

h) The amount of outstanding for more than one year and the amounts written off, if any;...... ................. ......................... ..................................................... ........... No

i) Whether tenders were invited for repairs or construction involving expenditure exceeding Rs. 5000/-. .......... ..................................................... ........... N.A.

j) Whether any money of the public trust has been invested contrary to the provisions of Section 35...... ......................... ..................................................... ........... No

k) Alienations, if any of the immovable property contrary to the provisions of Section 36 which have come to the notice of the auditor;..................... ........... No

l) All cases of irregular, illegal or improper expenditure or failure or omission to recover monies or other property belonging to the public trust or of loss or waste of money or other........................... property thereof and whether such expenditure, failure, omission loss or waste was caused in consequence of breach of trust or misapplication or any other misconduct on the part of the trustees or any other person while in the management of the trust. No

m) Whether the budget has been filed in the form provided by rule 16 A;..................... ........... Yes

n) Whether the maximum and minimum number of the trustees is maintained.......... ........... Yes

o) Whether the meetings are held regularly as provided in such instrument.................. ........... Yes

p) Whether the minutes books of the proceedings of the meeting are maintained........... ........... Yes

q) Whether any of the trustees has any interest in the investment of the trust.............. ........... No

r) Whether any of the trustees is a debtor or creditor of the trust;.... ........... No

s) Whether the irregularities pointed out by the auditors in the accounts of the previous year have been duly complied with by the.......................... trustees during the period of audit ........... Yes

t) Any special matter which the auditor may think fit or necessary to.......................... bring to the notice of the Deputy or Assistant Charity Commissioner; ........... No

For Shripad Waikar & Associates
Chartered Accountants

CA Shripad Waikar
Proprietor (M. No. 140416)
Date : 24/08/2025
Place : Pune
UDIN : 25140416BMIOCI5911

# २४ वा वार्षिक अहवाल
# वार्षिक सर्वसाधारण सभा
# रविवार दिनांक २८ सप्टेंबर २०२५

समस्त सभासद भिडे बंधू, भगिनी आणि माहेरवाशिणी यांस सप्रेम नमस्कार !
आजच्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये सर्व भिडे कुलोत्पन्नांचे मन:पूर्वक स्वागत !

२२ सप्टेंबर २०२४ (रविवार) रोजी सह्याद्री सदन, टिळक रोड, पुणे - ४११ ०३० येथे वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन केले होते. १२ जानेवारी २०२५ ह्या दिवशी महालक्ष्मी सभागृह, पर्वती, पुणे येथे एक दिवसाचे भिडे कुलसंमेलन दिमाखात साजरे केले.

विविध पुरस्कार, विद्यार्थी गुणगौरव, ज्येष्ठांचा सत्कार, राष्ट्रीय गिर्यारोहक श्री. उमेश झिरपे यांचे गिर्यारोहण संबंधी उपयुक्त माहिती देणारे व्याख्यान, प्रसिद्ध गायिका, संगीत दिग्दर्शक, सौ. नीलाताई भिडे यांची सौ. वरदा भिडे आणि श्री. प्रभाकरपंत भिडे यांनी घेतलेली प्रकट मुलाखत, तसेच ६१ व्या आम्ही भिडे अंकाचा सौ. नीलाताई आणि इतर मान्यवरांच्या उपस्थितीत झालेला प्रकाशन सोहळा अशा सर्व विविध, भरगच्च कार्यक्रमांनी संमेलन थाटात साजरे झाले. त्याच संमेलनामध्ये पुढील वर्षी म्हणजे २०२६ मध्ये संमेलन घेण्यासाठी प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष श्री. चंद्रकांत भिडे यांनी किहीम (अलिबाग) येथे आपल्या रिसॉर्टवर संमेलन घेण्यासाठी उत्सुकता दाखविली आणि गणपतीपुळे देवस्थानचे ज्येष्ठ व पंचकमिटी सदस्य डॉ. विवेक भिडे यांनी सुद्धा उत्फूर्तपणे  संमेलन घेण्यासाठी तयारी दाखविली. त्यानुसार पुढील वर्षी म्हणजेच १७ आणि १८ जानेवारी २०२६ रोजी गणपतीपुळे येथील गौरीनंदन हॉल येथे दोन दिवसाचे निवासी भिडे कुलसंमेलन घेत आहोत. जुलै महिन्यात भिडे प्रतिष्ठानकडून सर्वश्री दिलीप भिडे, ले. क. सुनील भिडे, प्रशांत भिडे, प्रदीप भिडे, शंतनु भिडे, अमित भिडे ह्या मंडळींनी प्रत्यक्ष गणपतीपुळे येथे भेट देऊन डॉ. विवेक भिडे व श्री. महेश भिडे यांचे मार्गदर्शनानुसार संमेलन नक्की केले आहे.

अत्यंत खेदाची बाब म्हणजे नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठनचे अध्यक्ष श्री. शशिकुमार भिडे यांचे १८ जुलै रोजी हृदयविकाराच्या आजाराने दु:खद निधन झाले. प्रतिष्ठानचे कार्य अखंडित राहण्यासाठी आणि वृद्धी होण्यासाठी ते शेवटच्या श्वासापर्यंत कार्यरत राहिले. भिडे प्रतिष्ठानचा आलेख चढता राहण्यासाठी त्यांनी मोलाचे योगदान दिले. स्व. शशिकुमार भिडे यांना भिडे प्रतिष्ठानतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली !

भिडे प्रतिष्ठानची स्वत:ची वास्तू असावी याकरिता २००५ सालापासून प्रतिष्ठानचे दिवंगत अध्यक्ष श्री. प्रदीप भिडे, एम्. सी. भिडे यांनी वेळोवेळी आर्थिक मदतीसाठी आवाहन केले त्याचप्रमाणे माजी अध्यक्ष श्री. कुमार भिडे (सांगली) यांनीसुद्धा प्रतिष्ठानची स्वत:ची वास्तू होईल तोपर्यंत भाड्याने जागा घ्यावी आणि प्रतिष्ठानचे कार्यालय पुण्यात सुरू करावे. त्यासाठी २ ते ३ वर्षांचा भाड्यापोटी होणारा खर्च मी देईन अशी इच्छा प्रकट केली होती. परंतु देर सही दुरुस्त या प्रमाणे उशिरा का होईना आपण भिडे प्रतिष्ठानचे कार्यालयाकरिता स्वत:ची वास्तू जून मध्ये खरेदी केली आहे. जानेवारी २०२४ मध्ये आडिवरे संमेलनामध्ये श्री. श्रीधरपंत भिडे यांनी ३३ लाख रुपये आणि २०२५ मध्ये पुण्यात झालेल्या भिडे संमेलनामध्ये छत्तीसगड येथील श्री. मिलिंद भिडे यांनी ३० लाख रुपये अशी वास्तूसाठी एकूण ६३ लाख रुपये देणगी दिली. त्यामुळे आपल्या कार्यालयासाठी वास्तू खरेदी करणे शक्य झाले. या दोघा भिडे कुलबंधूंचे नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान ऋणी आहे.

भिडे प्रतिष्ठानची स्वत:ची वास्तू नव्हती तरीसुद्धा मुंबईचे अभय व स्व. सतिश भिडे, ठाणे येथील श्री. चंद्रकांतजी, दादरचे श्री. राजेंद्र भिडे आणि पुणे येथील ले. क. सुनील भिडे आणि स्व. शशिकुमार भिडे या सर्वांनी मोबदला न घेता आपल्या वास्तूचा प्रतिष्ठानकरिता वापर करण्यास अनुमती दिली. या सर्व भिडे मंडळींचे प्रतिष्ठान सदैव ऋणी आहे.

खरंतर वास्तूकरिता एकूण देणगी ६३ लाख रुपये जमा झाली. जागेची खरेदी आणि नूतनीकरण मिळून सुमारे ८० लाखापर्यंत बजेट आहे. प्रतिष्ठानकडे असलेल्या शैक्षणिक किंवा वैद्यकीय निधीतून वास्तूकरिता खर्च केलेला नाही. त्यामुळे आपल्याला वास्तूकरिता आणखी काही आर्थिक पाठबळाची आवश्यकता आहे. आम्ही सर्व कार्यकारिणी पदाधिकारी व सदस्यांनी धाडसाने घेतलेल्या निर्णयाला आपल्यासारखी दानशूर मंडळी व हितचिंतक नक्कीच आर्थिक सहाय्य आणि सहकार्य करतील असा आम्हाला विश्वास वाटतो.

आपण गेली अनेक वर्षे शैक्षणिक, वैद्यकीय, पूरग्रस्त, भिडे कुलातील खेळाडू, विद्यार्थी अशा भिडें मंडळींना मदत करीत आहोत. तसेच शिक्षणासाठी परदेशी जाणाऱ्या भिडे कुटुंबातील विद्यार्थी/विद्यार्थिनींसाठी ५ लाख रुपयाची देणगी मागील वर्षी मिळाली. त्या निधीमध्ये अधिक वृद्धी व्हावी अशी अपेक्षा आहे.

२०२१ मध्ये झालेल्या घटना दुरुस्ती प्रमाणे (प्रस्ताव क्र. १०३) दरवर्षी कार्यकारिणीमध्ये आपण दोन स्वीकृत सदस्यांचा समावेश करतो. त्यानुसार सौ. मेघना आशिष भिडे आणि श्री. विनायक विश्वनाथ भिडे, पुणे यांची पुन्हा एक वर्षाकरिता निवड केली आहे. दर तीन महिन्यांनी आम्ही भिडे अंकाचे वितरण प्राजक्त या एजन्सी द्वारे सर्व भिडे मंडळींना केले जाते. प्रतिष्ठानची स्थापना झाल्यापासून गेली २५ वर्षे मा. धर्मादाय आयुक्त, मुंबई यांचे कार्यालयामध्ये सर्व कागदपत्रे नियमितपणे वेळोवेळी दाखल केली जातात. दर ५ वर्षांनी गुप्त मतदान पद्धतीने आणि घटना कार्यप्रणालीनुसार प्रतिष्ठानच्या विश्वस्तांची निवड केली जाते. आता पुढील वर्षी म्हणजे २०२६ मध्ये निवडणुकीद्वारे विश्वस्तांची निवड होणार आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये प्रतिष्ठानतर्फे देण्यात आलेल्या शैक्षणिक, वैद्यकीय मदत निधीतून विनापरतफेड आर्थिक मदत तसेच नवीन आजीव सभासद आणि देणगी यांचा तपशील व काही ठळक बाबी खालीलप्रमाणे आहेत -

१) गरजू विद्यार्थी/विद्यार्थिनींना शिक्षणासाठी आर्थिक मदत - - - - - - - - - - - - - - - - रु. ०१,८७,५००/-
२) वैद्यकीय निधीतून आर्थिक मदत - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - रु. १०,०००/-
३) प्रतिष्ठानच्या वास्तूकरिता देणगी जमा - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - रु. ३०,००,०००/-
४) २०२४-२५ मध्ये मिळालेल्या देणग्या - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - रु. ०१,४९,४१३/-
५) शैक्षणिक मदत निधीकरिता देणग्या - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - रु. ०१,२५,०००/-
६) कॉर्पस निधी - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - रु. ०१,३५,०००/-
७) मागील वर्षातील (२०२४-२५) नवीन आजीव सभासद संख्या - - - - - - - - - - - - - - २९

चित्पावन कोकणस्थ ब्राह्मणांच्या हितसंवर्धनासाठी पुण्यात अनेक वर्षे कार्यरत असलेल्या महाराष्ट्र चित्पावन संघ, टिळक रोड, पुणे ह्या संस्थेच्या नूतन वास्तु संवर्धनासाठी नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान तर्फे एक लाख रुपये देणगी डिसेंबर २०२४ मध्ये देण्यात आली.

प्रतिष्ठानची उद्दिष्टे पूर्ण करताना येणाऱ्या देणग्या व सभासद वर्गणी यावरच प्रतिष्ठानचा निधी संकलित होत असतो त्यामधूनच केल्या जाणाऱ्या मुदत ठेवींच्या व्याजातून प्रतिष्ठानच्या माध्यमातून केला जाणारा खर्च होत असतो. भिडे ज्ञातीसाठी, आणि भिडे ज्ञातीने चालविलेल्या ह्या संस्थांमध्ये नि:स्वार्थपणे कार्य करणारी मंडळी आहेत. अनेक वर्षे अव्याहतपणे काम करत असलेल्या काही मंडळींना मनात इच्छा असूनही वयपरत्वे शारीरिक मर्यादा येतात. याकरिता नवीन, उत्साही भिडे मंडळींना प्रतिष्ठानमध्ये सक्रीय कार्यासाठी आवाहन करतो आहे. संस्था आदर्श असावी आणि तिच्या कारभारामध्ये पारदर्शकता यावी, हे काम कोणा एका व्यक्तीचे नसून सांघिक आहे. प्रतिष्ठानचे विश्वस्त, पदाधिकारी, स्वीकृत सदस्य यांच्या सहकार्याबरोबरच आपल्यासारख्या मंडळींचा विश्वास संस्थेवर आहे त्यामुळेच उत्साहाने, जोमाने काम करण्याची उर्मी आम्हा कार्यकर्त्यांना मिळते. भिडे प्रतिष्ठानची अनेक उद्दिष्टे पूर्ण करतांना या न्यासाचा लाभ व्हावा आणि ज्ञातीच्या उन्नतीसाठी, न्यासाची सर्वांगीण प्रगती व्हावी यासाठी आपण सर्व सहकार्य करीत आहातच असेच सहकार्य भविष्यातही असेल ह्याबाबत खात्री बाळगतो.

***समस्त भिडे मंडळींना, हितचिंतकांना दसरा व दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा !***

**प्रभाकर शंकर भिडे**
**उपाध्यक्ष**
**नि. गो. भिडे प्रतिष्ठान**